कोकण विभागातील नायब तहसीलदार या संवर्गातील तदर्थ पदोन्नत्या नियमित करण्याबाबत (निवडसूची सन २०२५-२६)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल विभाग**
**शासन आदेश क्रमांकः R&FD-१५०७१/२७/२०२६-MRF(DESKE९)**
**(E-१६२२५३९)**
**मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-०७.१०.२०२६

**वाचा :-**

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे पत्र क्र.मशा/आस्था/इएसबी/स.म.अ./मं.अ.पदोन्नती/२०२५-२६ दि.१८.०३.२०२६

**शासन आदेश:-**

कोकण विभागातील सहायक महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांना यापूर्वी सन २०२३-२४ या निवडसूचीतून नायब तहसीलदार या संवर्गात दिलेल्या तदर्थ पदोन्नती सन २०२५-२६ या निवडसूची वर्षात विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पदोन्नती समितीच्या दि.१७.०३.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील उपलब्ध असलेल्या पदांवर नियमित करण्यात येत आहेत.

**१) सहाय्यक महसूल अधिकारी संवर्ग :-**

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | अधिका-याचे नांव | जात प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | ९९-अ | श्रीम.छाया आखाडे | भ.ज.क. |
| २ | १७८ | श्रीम.क्षितिजा जोशी | खुला |
| ३ | १८० | श्रीम.करुणा जाधव (निकीता शर्मा) | अजा |
| ४ | १८२ | श्री.संजय मद्रे | विमाप्र |
| ५ | १८३ | श्रीम.रसिका रसाळ (नंदा राजाराम यादव) | भ.ज.क. |
| ६ | १८७ | श्रीम.स्वाती कामेरकर | इ.मा.व. |
| ७ | १९३ | श्री.पंजाबराव पवार | वि.जा.अ. |
| ८ | १९४ | श्री.मधुकर जाधव | वि.जा.अ. |
| ९ | १९७ | श्रीम.पूनम चव्हाण | इ.मा.व. |
| १० | १९८ | श्रीम.आरती पालवणकर | इ.मा.व. |

**२) मंडळ अधिकारी संवर्ग :-**

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | अधिका-याचे नांव | जात प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | १०४ | श्री.के.एस.देऊळगावकर | खुला |
| २ | १०५ | श्री.आर.ए.म्हात्रे | खुला |
| ३ | ३१ | श्री.एम.के.मोरे | अ.जा. |

२.	उपरोक्त नायब तहसीलदारांची तदर्थ पदोन्नती, पदोन्नतीच्या कोट्यात उपलब्ध पदांवर खालील अटींच्या अधीन राहून नियमित करण्यात येत आहे:-

(१)सहायक महसूल अधिकारी तसेच मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नतीकरिता निम्न संवर्गाच्या दिनांक ४.९.२०२५ रोजीच्या ज्ञापनाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या दिनांक १.१.२०२५ रोजीच्या अंतिम जेष्ठतासूचीस कोणत्याही न्यायालयात स्थगिती देण्यात आलेली नाही या अटीच्या अधीन राहून सदर पदोन्नती नियमित करण्यात येत आहे.

(२) निवडसूची तयार करताना कोणताही ज्येष्ठ कर्मचारी पदोन्नतीसाठी अनवधानाने वगळण्यात आलेले नाहीत अथवा अधिक्रमित झालेला नाही.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सा.प्र.वि. /१६ ब कार्यासनाच्या दि.०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर पदोन्नती नियमित करण्यात येत आहे. तसेच, दिनांक ७ मे, २०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती नियमित करण्यात येत आहे.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.३७९२/२०२५ व ८८९०/२०२६ मध्ये अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर पदोन्नती नियमित करण्यात येत आहे.

(३) भविष्यात न्यायालयीन अथवा पदोन्नतीच्या अनुषंगाने इतर काही आक्षेप निघाल्यास याची संपूर्ण जबाबदारी विभागीय आयुक्त, कोकण विभाग या कार्यालयाची राहील.

३.	सदर आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४.	सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६१००७१८५८०११८४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT,
2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.10.07 18:59:10 +05'30'

**(महेश वरूडकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

विभागीय आयुक्त, कोकण विभाग.

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा.उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क/क्रीडा व युवक कल्याण/ अल्पसंख्याक विकास आणि औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

६. संबंधित जिल्हाधिकारी.
७. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर.
८. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी.
१०. संबंधित आहरण व संवितरण अधिकारी.
११. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. संबंधित नायब तहसीलदार (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
१३. उप सचिव (आस्था-९) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. सह सचिव (कार्यासन-१२/सेवा-२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
१५. निवड नस्ती (कार्यासन आस्था-९), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.